दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २५६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२७ एप्रिल २०२५

**सुंदर सुविचार**
आपल्याला हवी असणारी गोष्ट मिळविण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे तीव्र इच्छाशक्ती.




# भारत-पाक सीमेवर घडामोडी वाढल्या...

## शेतकऱ्यांना २ दिवसांत शेत खाली करण्याचे आदेश !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, नवी दिल्ली :**

पहलगाम हल्ल्यानंतर पंजाबमधील भारत-पाकिस्तान सीमेवर अलर्ट जारी करण्यात आला आहे. BSF जवानांनी सुरक्षा आणि गस्त वाढवली आहे. अमृतसर, फिरोजपूर, गुरदासपूर, पठाणकोट हे जिल्हे पाकिस्तानच्या सीमेला लागून आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढल्यामुळे इडज्ञ ने सीमेवरील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. शेतकऱ्यांनी कुंपणाजवळ लावलेली गव्हाची कापणी दोन दिवसांत पूर्ण करून शेत खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत मोठी कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गुरुद्वारातून याबाबत घोषणा करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी वेळेत कापणी न केल्यास गेट पूर्णपणे बंद केले जातील, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी ४८ तासांच्या आत आपली कापणी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. BSF



च्या आदेशानंतर शेतकऱ्यांनी तातडीने कामाला सुरुवात केली आहे. शेतकरी कंबाइन मशीनच्या साहाय्याने लवकर कापणी करत आहेत.

पंजाबमधील पठाणकोट ते फाजिल्कापर्यंत ५५३ किलोमीटर लांबीच्या सीमेवर सैन्याच्या हालचाली वाढल्या आहेत. BSF जवानांनी बॉर्डर आणि गावांमधील गस्त वाढवली आहे. गावांमध्ये कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास, तात्काळ पोलीस आणि BSF जवानांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गावकऱ्यांना सतर्क राहण्यास सांगितले आहे. BSF च्या क्विक रिएक्शन टीम्स सक्रिय झाल्या आहेत. बॉर्डरवर कोणतीही हालचाल दिसल्यास, थेट गोळी मारण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

फिरोजपूरमधील कालू वाला हे गाव सतलुज नदीने तीन बाजूंनी वेढलेले आहे. याच्या एका बाजूला पाकिस्तान आहे. गावकऱ्यांनी सांगितले की, भारत-पाक तणावामुळे या गावाला नेहमी सर्वात आधी खाली केले जाते. त्यामुळे येथील नागरिक भयभीत आहेत. ज्या शेतकऱ्यांची जमीन तारेच्या कुंपणाच्या पलीकडे आहे, त्यांना लवकर कापणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे पंजाबमधील सीमेवरील गावे लवकरच खाली केली जाऊ शकतात. यामुळे सीमेवरील गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

शून्य रेषेच्या आधी पंजाबमधील या गावांमध्ये शेतकऱ्यांना विशेष परवानगी घेऊन शेती करण्याची परवानगी आहे. पीक पेरणी आणि कापणीच्या वेळी इडज्ञ जवान त्यांच्यासोबत तैनात असतात. तारेचे कुंपण हे शून्य रेषेच्या खूप आधी आहे. शून्य रेषेवर फक्त खांब आहेत. BSF ने शेतकऱ्यांना ४८ तासांत गव्हाची कापणी करून शेत खाली करण्याचे आदेश दिले आहेत. गुरुद्वारातून याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. वेळेत कापणी न केल्यास गेट बंद केले जातील, असे सांगण्यात आले आहे. इडज्ञ च्या या आदेशामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जर ठरलेल्या वेळेत पीक कापले नाही, तर गेट पूर्णपणे बंद केले जातील. त्यामुळे शेतकऱ्यांनी ४८ तासांच्या आत आपले पीक कापून सुरक्षित करावे, असे गुरुद्वारातून सांगण्यात आले आहे.

## थोडक्यात

### हदगाव शहर व ग्रामीण भागात खुलेआम गुटखाविक्री... अन्न औषध प्रशासनाचे दुर्लक्ष !




**अक्षराज : चंद्रकांत भोरे**
**दि.२६, हदगांव (नांदेड) :** हदगाव शहरामध्ये राजरोसपणे अवैध गुटख्याची वाहनाद्वारे आयात करून शहरासह ग्रामीण भागात जीवघेण्या गुटखा व सुगंधी तंबाखू ची खुलेआम विक्री सुरू आहे या अवैध धंद्यात दररोज लाखोंची उलाढाल होत असल्याचे पाहावयास मिळत आहे अन्न व औषध प्रशासन लक्ष्मी दर्शनाच्या माध्यमातून धृतराष्ट्राची भूमिका घेत गुटखा तस्कर यांची पाठराखण करीत असल्याचे पाहावयास मिळत आहे हे हिमायतनगर या शहरातून चार चाकी च्या माध्यमातून हदगाव शहरात मोठ्या प्रमाणात गुटख्याची सकाळी तीन ते चारच्या सुमारास आयात केली जात आहे. हिमायतनगर व हदगाव या दोन ठिकाणावरून अनेक शहरासह ग्रामीण भागात गुटखा पोहोचविला जातो तालुक्यात ग्रामीण भागातील सर्वच किराणा दुकानात, कॅन्टींग पान टपरी धारकाच्या दुकानासमोर गुटखा तस्कर मोटरसायकल उभी करून त्यांना गुटका व सुगंधी तंबाखू पोहोचवीत व दर्शनी भागात गुटख्याची माळ लावून राजरोसपणे विक्री केल्या जाते हा सर्व प्रकार औषध प्रशासन अर्थपूर्ण संबंध जोपासत कारवाई करण्यास धजावत नाही. गुटख्यात मॅग्नेशियम कार्बोनेट सारख्या घातक घटकांमुळे कर्करोगासारख्या गंभीर आजार होण्याची शक्यता सुद्धा आहे तंबाखूजन्य पदार्थामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडू नये यासाठी राज्य सरकारने २०१२ मध्ये गुटख्याच्या तंबाखूजन्य सुपारी पान मसाल्याच्या पदार्थाची निर्मिती आणि विक्रीवर बंदी घातली आहे.

### व्हिसा कॅन्सल, वाघा बॉर्डर बंद...



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, नागपूर :** पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारच्या एका निर्णयामुळे अनेक कुटुंबं पाकिस्तानात अडकली आहेत. भारत सरकारने पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द केला आहे. दीर्घकालीन व्हिसाही रद्द करण्यात आला असून पाकिस्तानातून येणाऱ्यांसाठी वाघा बॉर्डरही बंद करण्यात आली आहे. टाइम्सच्या रिपोर्टनुसार, नागपुरातील काही लोक लग्नासाठी पाकिस्तानला गेले होते पण ते परत येऊ शकत नाहीयेत. यापैकी काही लोकांना भारतात परतायचे होते, पण सीमा बंद झाल्यामुळे ते पाकिस्तानात अडकून पडले आहेत.

नागपूरच्या रवी कुकरेजा यांच्या पत्नी कमलीबाईही पाकिस्तानात अडकल्या आहेत. ३० वर्षीय कमलीबाई पाकिस्तानातील सिंध प्रांतातील घोटकी येथे एका लग्नासाठी गेल्या होत्या. भारताने व्हिसा रद्द केल्याचे कळताच त्या तात्काळ वाघा बॉर्डरसाठी रवाना झाल्या. ट्रेनने ७०० किलोमीटरचा प्रवास करून त्या अटारीला पोहोचल्या, पण सीमा बंद करण्या आली होती. त्यामुळे त्यांना त्यांच्या गावी परतावे लागले. कमलीबाईचे पती रवी कुकरेजा यांनी सांगितले की, वाघा सीमेवर १०० हून अधिक कुटुंबे भारतात येण्याची वाट पाहत आहेत.

## जायकवाडी धरणाचे होणार पुनरुज्जीवन; धरणाला ५० वर्षे पूर्ण !

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, पैठण :** जायकवाडी धरण निर्मितीला ५० वर्षे पूर्ण होत असल्याने केंद्र शासन व राज्य शासनाने 'ड्रीप टू' योजनेअंतर्गत धरणाचे पुनरुज्जीवन हाती घेतले आहे. कामासाठी ७८ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला असून, प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे.

तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या हस्ते १८ ऑक्टोबर १९६५ रोजी जायकवाडी धरणाचा पायाभरणी कार्यक्रम झाला होता. २४ फेब्रुवारी १९७६ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जायकवाडी धरण राष्ट्राला समर्पित केले होते. या धरणाला पुढील वर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. केंद्र व राज्य शासनाने संयुक्तपणे राज्यातील जलअभ्यासक व तज्ज्ञ अभियंत्यांची समिती नेमून, सन २०२०पासून 'ड्रीप टू'योजनेअंतर्गत



राज्यातील ५० वर्षे झालेल्या जुन्या धरणांचे पुनरुज्जीवन सुरू केले आहे. त्यात राज्यातील १२ धरणांचा समावेश आहे. पैठण येथील जायकवाडी धरणाचा समावेश करण्यात आला आहे.

जायकवाडी धरणाचे मजबुतीकरण व पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी तज्ज्ञांच्या समितीने सूचना केल्या आहेत. त्यानुसार अहवाल तयार करून नाशिक येथील 'मेरी' संस्थेद्वारे अहवालाची तांत्रिक तपासणी करून जायकवाडीच्या मजबुतीकरणासाठी विविध कामांचा आराखडा व अंदाजपत्रक तयार करून राज्यस्तरीय धरण सर्वेक्षण समितीला सादर करण्यात आले. या प्रस्तावास विभागाने तात्काळ मंजुरी देऊन, ७८ कोटी रुपये निधीस मान्यता दिली आहे, अशी माहिती जायकवाडी धरणाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव यांनी दिली.

या निधीचे दोन भाग करण्यात आले असून, पहिल्या टप्प्यात १७ कोटीत मूलभूत सुविधांमध्ये पर्यटकांसाठी विश्राम गृह, रस्ते, परिसराचे सुशोभीकरण, पथदिवे, हिरवळीसह इतर सुविधा उभारण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात ६१ कोटी निधीतून धरणाच्या १० किलोमीटर लांबीच्या सुरक्षा भिंतीची दुरुस्ती करणे, दगडी बांधकाम निखळल्याने त्याचे पुनरुज्जीवन करणे, धरणाचा उत्तर-दक्षिण भिंतीला अद्यावत कुंपणासह सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे सुरक्षा यंत्रणा भक्कम होणार आहे.

**खडकाचे सपाटीकरण करणार**

धरणाच्या २७ गेटसमोरील सांडव्याला काँक्रीट करून मजबुतीकरण करणे, धरण भरल्यानंतर गोदावरी नदीपात्रात जलविसर्ग सोडल्यानंतर धरणासमोर पात्रालगत वर आलेल्या खडकाळ भागाचे सपाटीकरण केले जाणार आहे. त्याचे काँक्रीटीकरण केल्यामुळे जलविसर्गाला अडथळा न येता पूर नियंत्रणावर लक्ष केंद्रीत करण्यास मदत होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## एल्फिन्स्टन पूल आज मध्यरात्रीपासून वाहतुकीसाठी बंद...

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२६, मुंबई :** परळ आणि प्रभादेवी परिसरास जोडणारा ऐतिहासिक ब्रिटीशकालीन एल्फिस्टन पूल पाडण्यात येणार आहे. त्यासाठी हा पूल रविवार (२७ एप्रिल) रोजी रात्री ९ वाजल्यापासून वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वांद्रे- वरळी सागरी सेतूला थेट अटल सेतूशी शिवडी येथे जोडण्यात येणार असून, त्यासाठी हा पूल पाडून 'एमएमआरडीए'च्या वतीने नवीन पूल बांधण्यात येणार आहे. यासाठी या पुलावरील वाहतूक रवीवारी



रात्री ९ वाजल्यापासून बंद करण्यात येणार आहे. दोन वर्षांसाठी हा पूल बंद करण्यात येणार आहे.

दरम्यान, एल्फिस्टन सारखा महत्त्वाचा पूल बंद राहणार असल्याने वाहतूककोंडी होण्याची शक्यता आहे. ती टाळण्यासाठी वाहतूक इतर मार्गाने वळवण्यात आली आहे.

**असे असणार पर्यायी मार्ग..**

दादर पूर्वेकडून पश्चिमकडे आणि दादर मार्केटकडे जाणाऱ्या वाहनांना टिळक ब्रीजचा वापर करता येईल. तर, परळ पूर्वेकडून प्रभादेवी आणि लोअर परळकडे जाणारी वाहने करी रोड ब्रीजचा वापर करतील.

परळ, भायखळा पूर्वेकडून प्रभादेवी, वरळी, कोस्टल रोड व सी-लिंकच्या दिशेने जाणारी वाहने ही चिंचपोकळी ब्रीजचा वापर करतील.

प्रभादेवी व लोअर परेल पश्चिमेकडून परळला, टाटा रुग्णालय व के.ई.एम रुग्णालयकडे जाणाऱ्या वाहनांना दुपारी ३ ते रात्री ११ या काळात करी रोड ब्रीजचा वापर करता येईल.

**करी रोड रेल्वे ब्रिजवरून..**

कॉम्रेड कृष्णा देसाई चौककडून (भारत माता जंक्शन) शिंगटे मास्तर चौककडे वाहतूक ही सकाळी ७ ते दुपारी ३ या काळात एकेरी असणार आहे. तर शिंगटे मास्तर चौकाकडून कॉम्रेड कृष्णा देसाई चौकाकडे (भारत माता जंक्शन) वाहतूक दुपारी ३ ते रात्री ११ या वेळेत एक मार्गी असणार आहे.


# संपादकीय



## गुलमोहर...

शिशीर ऋतूमध्ये झाडांची पाने गळतात. जवळ जवळ सगळे वृक्ष पर्णविहीन होतात. वसंत ऋतूचे आगमन झाल्यावर चैत्र महिन्यात काही झाडांना नवी पालवी फुटते. ही नाजूक लुसलुशीत पालवी हळूहळू मोठी होत जाते. तिचे हिरव्यागार पानांत रुपांतर होते आणि पर्णविहीन झालेली झाडे हिरव्यागार पानांनी बहरून येतात. एकीकडे उन्हाळ्याची चाहूल लागलेली असते आणि दुसरीकडे कडुनिंबाची झाडे हिरवा शालू नेसल्यासारखे हिरवीगार होऊन जातात.तिकडे फाल्गुन महिन्यात पर्णविहीन झालेला पळस लालबुंद फुलांनी सजलेला असतो. पुर्वी होळी आणि रंगपंचमी सणाला पळस फुलांचा नैसर्गिक रंग खेळला जायचा पण कृत्रिम रंगांच्या नादात ही गोष्ट आता भूतकाळात जमा झाली आहे.चैत्र महिन्याच्या शेवटी शेतकरी शेतातील रब्बी पिकांची रास करून धान्ये घरांत आणतात आणि सगळे शेत ओडके बोडके होते. एरवी दाव्याला बांधून ठेवलेली जनावरे रानोमाळ हिंडून पालापाचोळा खातात.दुपारच्यावेळी शिवारात उपलब्ध असलेले थंडगार पाणी पिऊन तृप्त होतात आणि दुपारच्या रणरणत्या उन्हात हिरव्या झाडांच्या सावलीत जाऊन बसतात. जिकडे तिकडे उन्हाळ्याचे रणरणते उन असते आणि तप्त सूर्यकिरणे पृथ्वीला भाजून काढतात. सगळीकडे वैशाख वणवा पसरतो आणि जीवसृष्टीच्या अंगाची लाही लाही होते.असाह्य उकाडा जीव कासावीस करून टाकतो. उन्हाच्या झळा आगीचे स्त्रोत सर्वत्र पसरवतात आणि वैशाख वणव्यातला उकाडा जगणे मुश्कील करतो. रानावनात आगडोंब उसळतो आणि जीवसृष्टी नष्ट होते की काय अशी भीती वाटते.अशा ह्या भयंकर व रणरणत्या उन्हात आणि उघड्या बोडक्या उजाड माळरानावर नैसर्गिक किमया पाहायला मिळते. ध्यानीमनी नसणारी आल्हाददायक गोष्ट स्पष्टपणे जाणवते.नेहमी दूर्लक्षित राहणारा गुलमोहर फ ुलतो आणि सर्वांचे लक्ष वेधून घेतो. त्याची ती टवटवीत लालबुंद फुले एक प्रचंड असा आशावाद मनात रुजवतात. लाल फुलांनी बहरून आलेले आणि लाल फुलांनी सजलेले गुलमोहराची झाडे मानवी मनाला मोहून टाकतात,उदास मनाला प्रसन्न करतात. रणरणत्या उन्हाळ्यात मानवी मन उदास आणि दुःखी कष्टी झालेले असते, मनात नकारात्मक भावना उचमळत असते तेव्हा टवटवीत अशा लालबुंद फ ुलांचा मनमोहक गुलमोहर जीवन जगण्याचा मूलमंत्र देतो. जीवनात कितीही संकटे आली तरी डगमगायचे नसते,नवा आशावाद व नवी स्वप्ने उराशी बाळगून बहरून यावे लागते आणि नव्या उमेदीने जीवन जगण्याचा आदर्श घेतला पाहिजे. जणू हीच शिकवण तो मनमोहक गुलमोहर आपल्याला देत असतो.आणि ते खरे आहे. कारण जीवसृष्टी होरपळून टाकणाऱ्या रणरणत्या उन्हाळ्यात सगळे कासावीस झालेले असतात आणि हा एकटा गुलमोहर कसा ऐटीत डौलाने उभा असतो.आणि त्याच्याकडे पाहणाऱ्याच्या मनाला मोहून टाकतो,सुखद गारवा देतो. वैशाख वणव्यात रानावनातील पाण्याचे साठे आटलेले असतात, जमिनीतील पाण्याची पातळी खाली घसरलेली असते.तहान लागलेले सगळे जीव पाणी पिण्यासाठी धडपडत असतात. पाण्याविना कोमेजून जातात आणि हा बहरलेला गुलमोहर रुबाबात गाणे गात असतो. या जगण्यावर या जन्मावर शतदा प्रेम करावे... धन्य तो मनमोहक गुलमोहर आणि धन्य ती निसर्गाची किमया... वैशाख महिन्यात ज्यांचे विवाह गाव खेड्यात आणि बौद्ध पद्धतीने होतात त्या विवाहांमध्ये आजही अक्षता म्हणून मनम ोहक गुलमोहरांच्या फुलांचा उपयोग केला जातो. रणरणत्या उन्हाळ्यात गुलमोहराच्या टवटवीत फुलांचा हा फार मोठा आधार मिळतो... काळ्याभोर आणि विस्तीर्ण अशा रखरखीत रान शिवारात फुललेला सुंदर, प्रफुल्लित आणि मनमोहक गुलम ोहर मानवी मनाला मोहून टाकतो, एक विलक्षण असा आनंद देतो.निसर्गाने दिलेली ही एक अनमोल भेट मानवी जीवनाला एक वरदान आहे.

## देविदास पाटील सन्मानाने सेवानिवृत्त



**दि.२६, भांडूप (मुं.उपनगर) :** डॉकयार्ड कॉलनी पवई इंग्रजी शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक देविदास पाटील यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन २६ एप्रिल रोजी म. वि. रा. शिंदे मार्ग शाळा सभागृह भांडूप (प.) येथे करण्यात आले होते. देविदास पाटील यांनी मुंबई महापालिका शिक्षण विभागात शारीरिक शिक्षण शिक्षक म्हणून जवळपास ३१ वर्षे निर्विघ्नपणे सेवा पार पाडली. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी अनेक अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, बहुसंख्य पालक, नातेवाईक व आप्तेष्ट उपस्थित होते.

# जागतिक पशुवैद्यकीय दिन

**– प्रवीण बागडे**
**नागपूर, ९९२३६२०९१९**

जागतिक पशुवैद्यकीय दिन एप्रिल महिन्याच्या शेवटच्या शनिवारी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश प्राण्यांच्या आरोग्य सेवेबद्दल जागरूकता पसरविणे आणि प्राण्यांवरील क्रूरता रोखण्यासाठी कोणती पावले उचलली पाहिजेत, पाळीव प्राण्यांच्या काळजीशी संबंधित विविध पैलूंबद्दल चांगल्या प्रकारे माहिती देऊन एक जबाबदार पाळीव प्राणी मालक होण्यास आपण कसे सक्षम असणे गरजेचे आहे हे देखील हा दिवस शिकवतो.

जागतिक पशुवैद्यकीय दिनाचा इतिहास १८६३ चा आहे. एडिनबर्गच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक जॉन गामगी यांनी युरोप मधील पशुवैद्यकांना बैठकीसाठी आमंत्रित केले होते. या बैठकीला आंतरराष्ट्रीय पशुवैद्यकीय काँग्रेस असे नाव देण्यात आले. १९०६ मध्ये जागतिक पशुवैद्यकीय काँग्रेसच्या ८ व्या अधिवेशनातील सदस्यांनी एक स्थायी समिती स्थापन केली होती. स्टॉकहोम मधील काँग्रेसच्या १५ व्या अधिवेशनात स्थायी समिती आणि इतर सदस्यांना मोठ्या संघटनेची गरज भासू लागली. त्यामुळे १९५९मध्ये माद्रिद येथे झालेल्या पुढील काँग्रेस अधिवेशना बरोबरच जागतिक पशुवैद्यकीय संघाची स्थापना झाली. १९९७ मध्ये नवीन राज्यघटना तयार करण्यात आली आणि संघटनेची रचनाही पूर्णपणे बदलण्यात आली. वर्ल्ड व्हेटर्नरी असोसिएशन मध्ये ७० हून अधिक राष्ट्रांतील सदस्यांचा समावेश आहे. असोसिएशन मधील प्रत्येक सदस्याला ठराविक सदस्यता शुल्क भरावे लागते. २००१ मध्ये जागतिक पशुवैद्यकीय संघटनेने एप्रिलच्या शेवटच्या शनिवारी जागतिक पशुवैद्यक दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला.



जागतिक पशुवैद्यकीय संघटनेने इतर अनेक उपयुक्त प्रकल्प सुरू केले. त्यांनी वर्ल्ड ऑर्गनायझेशन फॉर ॲनिमल हेल्थशी सहकार्य केले आणि ठरवले की जागतिक पशुवैद्यक दिन पुरस्कारही दिला जावा. हा व्यायाम २००८ मध्ये सुरू झाला आणि पशुवैद्यकीय व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी उपयुक्त ठरला आहे. हा पुरस्कार प्रथम केनिया पशुवैद्यकीय संघटनेला मिळाला.

प्राण्यांचे आरोग्य, कल्याण आणि सार्वजनिक आरोग्यासाठी त्यांनी केलेल्या कठोर परिश्रमाबद्दल **सर्व पशुवैद्यकांना जागतिक पशुवैद्यक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**

# वार्षिक राशिफल २०२५ – मिथुन राशी

**मिथुन रास –** २९ मार्च २०२५ रोजी शनी महाराजांनी मीन राशीत प्रवेश केला आहे. त्यामुळे यावर्षी मिथुन राशीच्या लोकांना त्यांच्या मेहनतीचे संपूर्ण फळ प्रदान होणार आहे. धनसंपत्ती मानसन्मान सर्व बाजूने लाभच लाभ मिळतील. गुप्त शत्रू वरही विजय मिळवू शकाल. व्यापार धंद्यात मोठे मोठे लाभ होतील. कारण यावर्षी श्री शनि महाराजांची विशेष कृपा तुमच्यावर राहणार आहे. तुमच्या राशीपासून शनी महाराज हे दशम स्थानात असल्यामुळे तुमच्या कुटुंबासोबत तुमचा वेळ छान जाईल, व घरात आनंदाचे वातावरण असेल. तसेच तुम च्या मेहनतीने तुम्ही पैसा व समाजात मानसन्मान या गोष्टी मिळवण्यात यशस्वी व्हाल. तुमची बौद्धिक क्षमता वाढेल. निर्णय क्षमता वाढेल. त्यामुळे अशा चांगल्या स्थितीत तुम्ही तुमच्या भविष्याच्या बाबतीत चांगले निर्णय घेऊ शकाल. ज्योतिष शास्त्रानुसार राहू हा ग्रह भाग्य स्थानात शुभ फळे देतो. त्यामुळेच तुमच्या वैवाहिक जीवनात व व्यापार धंद्यातही आनंदी आनंद निर्माण होईल. विवाह उत्सुक असाल तर विवाह जम ेल. प्रेम विवाह करायचा असेल तर मात्र अनेक कटकटींसह का होईना पण प्रेमविवाह होईल. शनि महाराजांची दृष्टी दशम स्थानात असल्यामुळे मातृ सुखातही वाढ होईल. आईचे एखादे




आजारपण असेल तर ते आता नष्ट होईल. आर्थिक संकटाशी संबंधित असलेल्या समस्या यावर्षी संपुष्टात येतील. तुमच्या करियर साठी हे वर्ष खूप छान असेल. तुमच्या नोकरीतही नवीन फायद्याच्या गोष्टी घडतील. तुम्हाला प्रमोशन मिळेल. दशम ातील शनी हा धंदा व्यवसायात प्रगती करवितो. पगार वाढ व बदलीची ही शक्यता आहे. व्यापारी असाल तर गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी चांगलाच नफा मिळेल. तुम्ही बोलण्यात हुशार आहातच त्याच बोलण्याचा फायदा तुम्हाला तुमच्या व्यवसायात होईल. परदेशात जाऊन गुंतवणूक करायची असेल तर नक्की करा. फायदाच होईल तसेच आधी केलेल्या गुंतवणुकीतून अडकलेले पैसेही आता आरामशीरपणे परत मिळतील. गुरुचे १२ व्या स्थानातून होणारे संक्रमण हे शैक्षणिक दृष्ट्या खूप चांगले आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशी जाऊ शकता. शिक्षणासंबंधीत येणाऱ्या छोट्या छोट्या अडचणी देखील २९ मे नंतर संपुष्टात येतील. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. सरकारी नोकरीच्या शोधात असेल तर सरकारी नोकरी ही मिळेल, पण यासाठी तुम्हाला कठोर परिश्रम घ्यावे लागतील. येणाऱ्या मे महिन्यानंतर स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा विचारही तुम्ही करू शकता, गाडी खरेदीचे योग आहेत. शेअर मार्केटमध्ये मात्र नुकसान होऊ शकते. सोन्यामधील गुंतवणूक फायदे फायदेशीर ठरेल. आरोग्याच्या बाबतीत सांगायचे झाले तर डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो, अंगदुखी व पोटाच्या तक्रारी देखील जाणवतील. मानसिक आरोग्य ही संभाळावे लागेल.

**उपाय –** गुरुची उपासना करणे व दत्तगुरूचे दर्शन घेणे. गाईला हिरवा चारा घालणे. दर बुधवारी दुर्गेच्या देवळात जाऊन फुलांची माळ अर्पण करणे. अथवा दर मंगळवारी हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेणे. अथवा अंध व्यक्तीला भोजन दान करणे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नीतिमत्ता स्वच्छ ठेवणे.

**– देवयानी कुलकर्णी.**
**खारघर (रायगड)**

## कन्ट्रोल..

लक्षपूर्वक करायचा
वेळी डॅमेज कन्ट्रोल
मिडिया सजून बसे
सर्वत्रकरायला ट्रोल

फोटो काढे सटासट
कॅमे-यांत खूप रोल
नेताबनले अभिनेता
सांभाळे सगळे रोल

जरासे काही चुकता
सिस्टिमला का बोल
इमेजअसे महत्वाची
चारित्र्य अति अमोल

राळ उडता अंगावरी
कसे चुकवणारं मोल
प्रकाशा आणे लफडे
प्रतिपक्षाचे सर्वझोल

सोन्याची लंका दिसे
डळमळीत होई तोल
रावण राहतो तिकडे
गर्तेत लोटणार खोल

बातमी पेटते झळाळ
धडाधड बडवत ढोल
पटवून सुध्दा रे पटेना
प्रयास पडतात फोल

आडवे तिडवे रिपोर्ट
तयार तो एक्झिटपोल
लपवले किती लफडे
करू पाहते पोलखोल

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे



जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे.

जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता.

रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही . या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले.

दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या म हासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे.

दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# इरई नदी खोलीकरण अभियानाचा जल्लोषात शुभारंभ

## चंद्रपूरची 'जीवनवाहिनी' असलेल्या इरई नदीसाठी लोकचळवळ उभी होईल - पालकमंत्री डॉ.वुईके

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, चंद्रपूर :** इरई नदी ही चंद्रपूरची जीवनवाहिनी आहे. लोकसहभागातून आणि प्रशासनाच्या सहकार्याने नदीचे खोलीकरण अभियान यशस्वी होईल. या अभियानाच्या निमित्ताने लोकचळवळ उभी राहील असा विश्वास आहे. त्यादृष्टीने चंद्रपूर जिल्हा नदी संवर्धनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत असून पर्यावरण पूरक आणि लोकाभिमुख उपक्रमांची दिशा या उपक्रमातून स्पष्ट होत आहे, असे प्रतिपादन चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.अशोक वुईके यांनी केले.

चंद्रपूर शहराची जीवनवाहिनी असलेल्या इरई नदीच्या खोलीकरण अभियानाचा शुभारंभ राज्याचे आदिवासी विकास मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ.अशोकवुईकेयांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आला. त्यावेळी डॉ.वुईके बोलत होते.

या कार्यक्रमाला राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांच्यासह विविध शासकीय अधिकारी, कर्मचारी व मान्यवर उपस्थित होते.

नदी खोलीकरणाचा संकल्प करून हे अभियान यशस्वी करण्यासाठी लोकांनी सहभागी व्हावे. माध्यमांनी व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन डॉ.वुईके यांनी केले. राळेगाव विधानसभेतील चक्रवती नदी लोकसहभाग आणि प्रशासनाच्या सहकार्याने नदीच्या स्वच्छतेचे काम हाती घेतले व ते यशस्वी झाले.

इरई नदीच्या सौंदर्यकरणाचे काम देखील १०० टक्के पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांना मिळणारे वेतन आणि भत्ते मिळून एकूण ५ लाख रुपयांचा धनादेश या अभियानासाठी सुपूर्द करीत असल्याचे पालकमंत्री म्हणाले.



### प्रशासन व लोकसहभागातून इरईला नवे रूप देण्याचा निर्धार : आ.मुनगंटीवार

निसर्ग रक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी आहे आणि आजपासून सुरू झालेले इरई नदी खोलीकरण अभियान हे भावी पिढ्यांसाठी संजीवनी ठरणार आहे. या अभियानासाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा पगार देत दिलेला सहभाग कौतुकास्पद असून, या पवित्र कार्यात स्वतःचा एक महिन्याचा पगार देण्याची घोषणा राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली. आ. मुनगंटीवार म्हणाले, पालकमंत्री डॉ. अशोक ऊईके यांच्या नेतृत्वात इरई नदी खोलीकरणाची सुरुवात होत असून हा संपूर्ण जिल्ह्यासाठी आनंदाचा क्षण आहे. या अभियानात सहभागी होत कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा पगार दिला असून, त्यांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे मी स्वतः देखील एक महिन्याचा पगार जाहीर केला. ही भावना सर्व जिल्ह्यांमध्ये निर्माण झाली तर राज्यातील नद्यांचे चित्र पालटू शकते, असेही ते म्हणाले. जलतज्ञ राजेंद्र सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात चला जाणूया नदीला हे अभियान सुरू करण्यात आले होते. इरई नदीतील साचलेल्या ओव्हरबर्डनमुळे या नदीसाठी स्वतंत्र उपाययोजना करण्याची गरज असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. तसेच ८१ किलोमीटर लांबीच्या इरई नदीपैकी १७ किलोमीटरच्या खोलीकरणासाठी दीर्घकालीन उपाययोजना राबवण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.चंद्रपूरमध्ये सरासरी ११०० मिमी पावसाचे प्रमाण असून, या पाण्याचा योग्य वापर, संवर्धन आणि जमिनीत जिरविणे आवश्यक आहे; त्यामुळे पावसाच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग होण्यासाठी प्रभावी आणि दूरदृष्टीने नियोजन करणे गरजेचे असल्याचे आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले. तसेच चंद्रपूरमध्ये साबरमतीसारखा आधुनिक रिव्हर फ्रंट विकसित करण्याचा संकल्प केला असून येणा-या कालावधीत सरकार रिवर फ्रंटला ही मान्यता देईल, असा विश्वास आमदार मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आज भव्यदिव्य मिरवणूक

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२६, धाराशिव :** बहुजन योद्धा सामाजिक संघटनेच्या वतीने महामानव, बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त रविवार, दिनांक२७ एप्रिल २०५ रोजी धाराशिवयेथे भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि जन्मशताब्दी वर्षानिमित्त देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा जयंती उत्सव समितीचे मार्गदर्शक धनंजय नाना शिंगाडे यांनी दिली.

धाराशिव शहरातील मेघमल्हार हॉलमध्ये नुकतीच आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मुकुंद घुले, माजी अध्यक्ष ॲड.परवेज अहमद, कोषाध्यक्ष विशाल शिंगाडे, मार्गदर्शन समिती सदस्य खलील सय्यद, ॲड. खंडेराव चौरे, राजेंद्र अत्रे, इलियास पीरजादे, प्रसेंजीत शिंगाडे, सरपुत शिंगाडे, रवि कोरे आळणीकर, इंद्रजित देवकते यांची प्रमुख उपस्थिती होती.

जयंती उत्सव समितीच्यावतीने यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ११ जणांचा सम्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी माजी मंत्री राम शिंदे यांना निमंत्रित करण्यात आले असून त्यांनी जयंती सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले आहे.




जिल्ह्यातील शासकीय कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ मिळावा. यासाठी अधिकारी जयंती उत्सव समितीच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करणार आहेत. याकरिता जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. धाराशिवची आकांक्षित जिल्ह्याची ओळख पुसण्यासाठी या माध्यमातून मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मूर्तींचे पूजन करून या मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. यामध्ये १२० लोकांचे गजाढोल पथक, तसेच केरळ राज्य, कोल्हापूर, सांगली व इतर जिल्ह्यातील पारंपरिक वाद्य पथक सहभागी होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. बदलत्या काळात पारंपरिक वाद्यांच्या पथकांना या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात जयंती समितीचे अध्यक्ष मुकुंद घुले यांनी जयंती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती दिली. तर जयंती समितीचे माजी अध्यक्ष ॲड. परवेज अहमद यांनी गतवर्षी झालेल्या कार्यक्रमाबाबत सविस्तरपणे सांगितले.

खलील सय्यद म्हणाले की, धनंजय शिंगाडे यांनी सर्व जातीधर्माच्या घटकांना सोबत घेऊन महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा करण्याची परंपरा सुरू केली आहे. ही परंपरा सामाजिक सलोखा कायम राहण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. ॲड. खंडेराव चौरे म्हणाले की, यावर्षी धनगर समाजातील मुकुंद घुले यांना जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी संधी देऊन धनंजय शिंगाडे यांनी सामाजिक सलोखा जपण्याचे काम केले आहे. धनगर समाजाचा आदर्श असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि जन्मशताब्दी वर्षानिमित्त देखील त्यांनी पुढाकार घेतल्याबद्दल ॲड. चौरे यांनी आभार व्यक्त केले.

इंद्रजित देवकते यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक कार्याविषयी माहिती देऊन सर्व बांधवांनी या जयंती सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन केले.दुपारी ३ ते ६ या वेळेत मिरवणूक उद्घाटन स्थळी कार्यक्रम होणार असून त्यानंतर मिरवणुकीस प्रारंभ होईल. भीम नगर, त्रिशरण चौक, पोष्ट ऑफिस, काळा मारुती चौक या मार्गावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकपर्यंत ही मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी जयंती उत्सव समितीचे आजी - माजी पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# प्लास्टिक प्रतिबंध कारवाईत ६० किलो प्लास्टिक जप्त

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजीच्या जागतिक वसुंधरा दिनापासून १ मे २०२५ रोजीच्या प्रदूषणमुक्त महाराष्ट्र दिनापर्यंत शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या परिपत्रकानुसार विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये निसर्गाच्या भूमी, जल, वायू, आकाश, ऊर्जा या पंचतत्त्वांच्या संरक्षण व संवर्धनासाठी नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जनजागृती करीत लोकसहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे प्राणी जीवनासह निसर्गाला हानी पोहोचविणाऱ्या प्लास्टिक विरोधी मोहिमांवर भर देण्यात येत असून परिमंडळ २ च्या प्लास्टिक प्रतिबंधात्मक भरारी पथकाने उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली मागील ३ दिवसात धडक कारवाई करीत प्रतिबंधात्मक प्लास्टिक वापर सापडलेल्या व्यक्ती व व्यावसायिकांकडून २० हजार रकमेची दंड वसूली केली तसेच ६७ किलो ७०० ग्रॅम प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त केले. यामध्ये प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशव्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

२४ एप्रिलला सेक्टर १९, कोपरखैरणे येथून रामदास वैष्णव यांच्या दुकानात एकल वापर प्लास्टिक आढळल्याने ५ हजार रकमेचा दंड आकारण्यात आला तसेच ४०० ग्रॅम प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला.

२५ एप्रिल रोजी ऐरोली टोल नाका या ठिकाणाहून दुचाकीवर ७ किलो प्लास्टिक पिशव्या व एकल वापराचे प्लास्टिक वाहून नेताना आढळल्याने वाहन क्र. एमएच ०१/ ईएल २३ हे दुचाकी वाहन ताब्यात घेण्यात आले. तसेच सुरेश गुप्ता यांच्याकडून ५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. त्याचप्रमाणे सेक्टर ८ एफ, ऐरोली येथे न्यू आदित्य पॅकेजिंग मध्ये प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर आढळल्याने ५ हजार रकमेचा दंड वसूल करून ३०० ग्रॅम प्लास्टिक जप्त करण्यात आले.



अशाच प्रकारे दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी ही सेक्टर १२, बोनकोडे येथे गुड्डू या आंबा विक्रेत्याकडून ६० किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला तसेच ५ हजार दंडात्मक रकमेची वसूली करण्यात आली.

वसुंधरा संरक्षण - संवर्धनाचा संदेश प्रसारित करतानाच, प्लास्टिक हा निसर्गाला व मानवी जीवनाला विघातक असा महत्त्वाचा घटक असून त्या विरोधातील मोहीमही महानगरपालिका तीव्रतेने राबवित आहे. तरी नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे टाळून पर्यायी कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# थोडक्यात

## मुर्टी (चिरेखाणवाडी) येथील विद्युत वितरणाची (डीपी) ची दुरवस्था



**अक्षराज : शरद भगत**

**दि.२५, मुर्टी (बारामती) :** महाराष्ट्र विद्युत कंपनीने अनेक ठिकाणी विद्युत वाहिण्यांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंती अथवा कंपाऊंड तयार केले आहेत. बारामती जिरायत भागातील मुर्टी ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये देखिल काही प्रमाणात कंपाऊंड घातल्याचे पाहीला मिळत आहे.परंतु मुर्टी ग्रामपंचायतीच्या हद्दीत चिरेखाणवाडी – बालगुडे वस्ती या वस्त्यांवरील विद्युत वाहकाची अत्यंत खराब अवस्था पहायला मिळत आहे. या विद्युत वाहकाच्या परिसरामध्ये लहान-मोठे झाडे, काटेरी झुडपे, वाळलेले गवत भरपुर प्रमाणात असल्याने येथील शेतकर्यांना रात्री फ्यूज टाकताना सापाची भिती वाटत असते. या भितीमुळे ज्या शेतकर्यांची पिके भिजवण्यासाठी रात्री विद्युत वाहका जवळ जाण्याचा विचार सुद्धा करत नसल्याने त्या शेतकर्यांची पिके पाणी असून देखिल जळून गेली आहेत. चिरेखाणवाडी येथे पुणे जिल्ह्यात सिंगल फ्यूजचा प्रयोग ही करण्यात आला आहे. परंतु महावितरणाच्या हलगर्जीपणामुळे येथिल स्थानिकांना याचा त्रास होतं आहे. काटेरी झुडपे लवकरात लवकर काढण्याची मागणी देखिल येथील शेतकरी वर्ग करत आहे. तसेच या विद्युत वाहिणीला दरवाजे व नविन फ्यूज मिळावे. अशी देखिल मागणी स्थानिकांनी केली आहे.

## पानगाव येथील भवानी मंदिरात भागवत कथेला प्रारंभ



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.२५, पानगाव (लातूर) :** पानगाव येथील जागृत देवस्थान असलेल्या भवानी मातेच्या मंदिरात दिनांक २५ एप्रिल २०२५ पासून ह.भ.प अनिल धर्माधिकारी महाराज यांच्या भागवत कथेला प्रारंभ रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील भवानी माता मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. या मंदिरावर कळस बसवण्यात येणार आहे. त्यानिमित्त दिनांक २५ एप्रिल पासून या कार्यक्रमा सुरवात झाली. सकाळी देवीचा अभिषेक व नित्य पुजा करण्यात आली व त्यानंतर श्री भागवत कथेला प्रारंभ करण्यात आला. पानगाव येथील भवानी मातेचे जागृत मंदिर आहे. नवरात्रामध्ये या देवीचा मोठा उत्सव असतो. बाहेर गावावरून या देवीला खूप भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात. पूर्वी या ठिकाणी जुने मंदिर होते. परंतु त्या मंदिराची खूप पडझड झाली होती. त्यामुळे मंदिराचा जीर्णोद्धार केला गेला. आता त्या मंदिरावर कळस बसनवण्याचा कार्यक्रम २५ एप्रिल पासून सुरु झाला आहे. त्यानिमित्त मंदिरामध्ये श्री भागवत कथेचे आयोजन करण्यात आले. रोज दुपारी २ ते ५ अनिल धर्माधिकारी महाराज यांची कथा होणार आहे. त्या नंतर देवींची आरती व महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे. या ७दिवसात देवीच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तरी या भागवत कथेचा सर्व भाविक भक्तनी लाभ घ्यावा, असे आव्हान मंदिर कमिटी कडून करण्यात येत आहे.

## 'पहलगाम' हल्ल्याच्या निषेधार्थ काँग्रेस रस्त्यावर; आतंकवाद ठेचून काढा





**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२६, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शांती मोर्चा काढून पहलगाम येथील दुर्दैवी आतकवादी घटनेचा निषेध व्यक्त करीत आतंकवाद ठेचून काढण्याची लेखी मागणी तहसील प्रशासनाकडे करण्यात आली आहे. यावेळी केंद्र सरकारच्या नार्कतेपणावर कडाडून हल्ला चढवित काँग्रेस तर्फे पाक विरोधात घोषणाबाजी देण्यात आली.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी आतंकवादी हल्ल्याची घटना घडल्याने यामध्ये निष्पाप २६ भारतीयांची निघृण हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ पक्षाची बैठक करण्यात आली होती. यावेळी हल्ल्यात मरण पावलेल्या सर्व भारतीयांना श्रद्धांजली वाहण्यात आली. बैठकीत मोदी सरकारच्या काळात देशाच्या सीमा सुरक्षित नसल्याने अशा प्रकारचा आतंकवादी हल्ला घडल्याची टीका काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांनी केली. शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी सैनिक लक्ष्मण देवदे, बालाजी गाडे यांनी ही केंद्र सरकारवर हल्ला चढवला. यावेळी मुदखेड काँग्रेस कमिटीच्या वतीने हल्ल्याच्या निषेधार्थ तहसील प्रशासनास लेखी निवेदन देण्यात आले. पहलगाम हल्ल्याचा निषेध व्यक्त करीत यावेळी पाक विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी प्रा.संदीपकुमार देशमुख बारडकर, माधव हामंद, मो. गौस, दादाराव पुयड, शिवानंद देवके, करीम खां साब, मुजीब पठाण, सूर्यकांत चौदंते, ऋषिकेश चौदंते, ज्ञानेश्वर मगरे, गिरीश कोत्तावार, मोईन फुलवाले, कुलदीप मल्लेवार, गणेश ढगे, प्रशांत पाटील, राधेशाम ढगे, शिवाजी वडजे, लतीफ टेलर, अतिक अहमद, आकाश सोनटक्के, साहेबराव गोरखवाड, ज्ञानेश्वर गोवडेवाड, गोपिनाथ कळणे, संभाजी गाढे, चक्रधर पवार पाटील, ज्ञानेश्वर पवार, महेश पवार, वेदांत शेवटे, बालाजी शिंदे, सुरेश गोवंदे, माणिकराव मुंगल, गणेश सूर्यतळे गौतम गोवंदे, भीमराव महादवाड, संग्राम देशमुख, संजय बोकेफोडे, बळवंत पाटील, प्रल्हाद राहेरे आदी उपस्थित होते.